
# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२**

Ph.:0253-2231714, 15 Ext 2002 http://-ycmou.digitaluniversity.ac

E-mail: mwkchair@ycmou.ac.in

## महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

**प्रेषक :** प्रा.विजयकुमार पाईकराव   **विषय :** सुभाषितांचे शैक्षणिक महत्व इतिवृत्त... अहवाल

**प्रति :** मा. कुलगुरू   **दिनांक :** २४/०३/२०२५

कृपया आपल्या कल्पक मार्गदर्शनातील चौथे पुष्प, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने. यशवाणी रेडीओवर “सुभाषितांचे शैक्षणिक महत्व,, या विषयावर प्रा.विजयकुमार पाईकराव यांचे,व्याख्यान भारतीय सौर फाल्गुन २९, शके १९४६ दि.२०/०३/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केले होते. त्याचा इतिवृत्त अहवाल पुढीलप्रमाणे सविनय सादर.

### ॥ इतिवृत्त अहवाल ॥

मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या कल्पक मार्गदर्शनातील चौथे पुष्प, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने. यशवाणी रेडीओवर “सुभाषितांचे शैक्षणिक महत्व,, या विषयावर प्रा.विजयकुमार पाईकराव भारतीय सौर फाल्गुन २९, शके १९४६ दि.१८/०३/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता यांनी शांत सुस्वभावी व सुमधुर वचनांनी,सुभासितानी गुंफले.

या वेळी त्यांनी आपल्या प्रतिपादनात प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी पुढील विवेचन केले.
संत तुकाराम माननीय म्हटल्याप्रमाणे, **विचारातून । न पाविजे समाधान ॥**
समाधान सत्सद विचारावर अवलंबून असते. तो विचार म्हणजे संस्कृत सुभाषिते, हिंदीतील दोहे, पालितील धम्मपदे, मराठीतील संतवचने, इंग्रजीतील सुवचने(Quotations & Proverbs), आणि उर्दूतील शेरोशायरी होत . **मी हा कोण करावा विचार । म्हणे ज्ञानेश्वर निवृत्तीचा ॥**
मी तत्वता कोण आहे याची ओळख ज्या विचाराने होते. असा सुभाषिततांतील विचारच अध्ययनार्थींचे कार्य खऱ्या अर्थाने दु:ख घालवून कृतीकार्यानंदी बनू शकेल. तत्त्वतः जीव आनंद स्वरूप असताना विपरीत विचाराने बद्ध होतो. त्या बंधमुक्ततेसाठी सारासार विचारांची सुवचनांची गरज असते. हे विचार म्हणजे सुभाषिते होय. संस्कृत मध्ये तर याला रत्न म्हणतात.
**पृथिव्या त्रीणी रत्नांनि जलमन्नं सुभाषितम ।**
**मुढै : पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते** ॥ या पृथ्वीवर फक्त तीन रत्ने आहेत .ती म्हणजे पाणी, अन्न आणि सुभाषिते होत. मूर्खलोक दगडाच्या तुकड्यांना रत्न म्हणतात.
**“अविचारकृती बंधो विचारेण निवर्तते”** अविचाराने निर्माण झालेले दु:ख विचारानेच निवृत्त होते. असा शास्त्रीय सिद्धांत आहे. तसेच व्यवहारिक जीवन सुखी व संपन्न करण्यासाठीही सारासार विचारांचीअतिशय गरज असते. म्हणूनच सर्व भाषेत या सुभाषितांनी मोलाचे निर्माण कार्य केलेले आहे.

अध्ययनार्थींनो शास्त्रीय ज्ञानाचा सागर अतिशय विस्तीर्ण आणि सखोल आहे. त्या अथांग सागरात उडी मारून वर काढलेले हे सारसंग्राही सुवचने, सुविचार, सुभाषितांचे मोती आपले व्यवहारी जीवन अधिकच अलकृत करून ज्ञानसमृद्ध करतील यात तीळ मात्र शंका नाही.


मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: ४८१/२०२२
दि. २४/ ७ /२०२५

कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त चांगला सिद्धांत सांगणे हेच सुभाषित व सुविचाराचे गमक होय. आशय आकाराने लहान असलेले हे अक्षर सुविचार आपल्या सुजान बुद्धीला प्रेरक ठरतात त्यातूनच भावनिक समायोजनाचे महान कार्यानंद घडवून आणू शकतात.

“घागर मे सागर,, या उक्तीप्रमाणे सर्व ज्ञान सागरातील रहस्यांचे थेंब एकत्र करून हा सुविचार सुभाषितांचा अमृतकुंभ महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने अध्ययनार्थी श्रोत्यांसाठी प्रा.विजयकुमार पाईकराव यांनी भरला आहे. त्याची

**काही प्रकाश क्षणचित्रे** :









या अमृतकुंभातील अनेक ज्ञान विज्ञानाचे थेंब संग्रहित करताना अनेक संत महात्म्य व विचारवंतांच्याग्रंथाचा मागोवा घेतला. त्याप्रमाणेच आपणही विविध परीक्षेत, मुलाखतीत, सुसंवाद साधताना, भाषण वलेखन करताना त्याचा उपयोग करावा. त्याचबरोबर थोर विचारवंतांच्या व प्रतिभावंतांच्या सिंधुतीलनिदान काही वेचक बिंदूंचा इतरांना आस्वाद घेता यावा यासाठी संग्रही करावा. याचा उपयोग सर्व अध्ययनार्थी, शिक्षक, कीर्तनकारांना ,साहित्यीकांना, पत्रकारांना, नक्की होईल. त्याशिवाय सुशिक्षितांनाहीआपल्या फावल्या वेळात यातील सुविचारांचा, सुवचनांचा सुभाषितांचा आनंद लुटता येईल त्यामुळे यासर्वांचे संभाषण, भाषण, लेखन अधिक सकस व प्रभावी होईल.दुसरे म्हणजे जगातील थोर माणसे सारख्याच तऱ्हेने विचार करतात याचाही प्रत्यय या सुभाषितां वरून आपणास येईल.

अध्ययनार्थी **श्रोत्यांसाठी काही संग्रही ग्रंथ**







**यशवाणी कार्यक्रम प्रपत्र :**



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
मागणी - प्रपत्र

अभ्यासक्रमाधारित यशवाणी (Web Radio) कार्यक्रम

प्रेषक : संचालक / प्रमुख
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन
प्रति : प्रमुख, दृक-श्राव्य केंद्र

विषय : यशवाणी कार्यक्रम
धारीका :
दिनांक : 19/3/2025

योग्य तेथे इष्ट पर्यायासमोर ✓ अशी खूण करावी.

- प्रस्तावित कार्यक्रमाची भाषा : मराठी [✓] इंग्रजी [ ] हिन्दी [ ] उर्दू [ ]
- प्रस्तावित कार्यक्रमाचे शिर्षक : सुभाषितांचे शैक्षणिक महत्व
- कोणत्या शिक्षणक्रमासाठी : सर्वांसाठी
- कोणत्या अभ्यासक्रमासाठी : सर्वांसाठी & EDU 405
- कार्यक्रमाचे एकूण भाग (No. of Episodes) :
- संबंधित विषय कोणासाठी : विद्यार्थी [✓] सर्वांसाठी [✓]
- श्राव्य कार्यक्रमाचे स्वरुप कोणत्या प्रकारचे आहे. : निबंधात्मक [ ] संवादात्मक [✓] प्राथमिक माहितीपर [ ]
- विषय तज्ञांचे नाव : प्रा. विजयकुमार पाईकराव
- विद्याशाखेचे/संस्थेचे/कॉलेजचे नाव : शिक्षणशास्त्र विद्याशाखा
- तपशिलवार पत्ता : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, नाशिक-422222
- संबंधीत विषय प्रक्षेपणास योग्य आहे काय ? : होय [✓] नाही [ ]
- प्रक्षेपण दिनांक आणि वेळ : 20.3.2025, स. 11 ते 12

कार्यक्रम संयोजक
यशवाणी, दृक-श्राव्य केंद्र

प्रमुख
दृक-श्राव्य केंद्र

विद्याशाखा

संचालक
प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२ २२२

19/03/2025

प्रत :

